IIP: WJHSS | IIP World Journal of Humanities and Social Sciences

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# "वंचितवादी इतिहास लेखन प्रवाहाचे चिकित्सक परिक्षण"

**डॉ. रायसिंग जालिंदर पाटील**

संस्कार मंदिर संचालित

कला व वाणिज्य महाविद्यालय वारजे माळवाडी पुणे

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***
*नवविचारप्रवाह व दृष्टीकोन, सामाजिक शास्त्र*

**ABSTRACT**

इतिहास लेखनातील हे नवविचारप्रवाह व दृष्टीकोन यामुळेच इतिहासामध्ये नाविण्यपूर्ण बदल घडून येताना दिसतात.यातील 'वंचितवादी इतिहास लेखन प्रवाह' म्हणजे समाजातील उपेक्षित, दलित, आदिवासी, महिला आणि तळागाळातील लोकांच्या इतिहासाला मुख्य प्रवाहात आणणे. यामध्ये मार्क्सवादी विचारांतून प्रेरित होऊन 'अँटोनियो ग्रामची' यांच्या कल्पनेतून महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी आकार घेतलेला दिसून येतो. ज्यात सर्वसामान्यांचा संघर्ष, जीवनशैली आणि लोकपरंपरा यावर भर दिला जातो. मुळातच इतिहास हे महत्वाचे सामाजिक शास्त्र आहे. इतिहास लेखनात नवविचारप्रवाह व विविध दृष्टीकोन इतिहासाची मांडणी करताना इतिहासाच्या विकासात भर टाकत गेले. त्यातूनच पुढे साम्राज्यवादी, राष्ट्रवादी, मार्क्सवादी, वंचितवादी, स्त्रीवादी असे विविध प्रवाह इतिहास लेखनाच्या प्रवाहात नव्याने रूजण्यास सुरूवात झाली.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 3%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Patil, R. J. (2025). वंचितवादी इतिहास लेखन प्रवाहाचे चिकित्सक परिक्षण. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 1(VI), 1961–1965.

**प्रस्तावना:**

इतिहास लेखनामध्ये साम्राज्यवादी, राष्ट्रवादी, मार्क्सवादी, वंचितवादी, स्त्रीवादी, संरचनावाद, उत्तर संरचनावाद, आधुनिकतावाद, उत्तर आधुनिकतावाद, नवमार्क्सवाद असे विविध प्रवाह नव्याने दिसून येतात. सामाजिक बदलामुळेच समाजातील विविध घटकांचा किंवा पैलूंचा स्वतंत्र स्वरूपात विचार होवू लागला. त्यामुळे वस्तुनिष्ठता हा घटक इतिहास लेखनामध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येतो. या नवविचारप्रवाह व दृष्टीकोन प्रवाहातून समाज, राजकारण, संस्कृती, कायदा, अर्थव्यवस्था, धर्म, विचार या सर्वच दृष्टीकोनातून इतिहासलेखनास गती प्राप्त होत गेली.

प्रस्तूत शोधनिबंधाच्या माध्यमातून इतिहासातील नवविचारप्रवाह दृष्टीकोन या संदर्भात 'वंचितवादी इतिहास लेखन प्रवाहाचे चिकित्सक परिक्षण' याचा आढावा घेतला आहे.

**संशोधनाचे उद्देश.-**

१. इतिहास लेखन प्रवाहाचे आढावा घेणे.
२. राष्ट्रवादी इतिहास लेखन प्रवाह, मार्क्सवादी इतिहास लेखन प्रवाह यांचा अभ्यास कारणे
३. वंचितवादी इतिहास लेखनाचे स्वरूप व स्थिती अभ्यासणे.
४. वंचितवादी इतिहास लेखनातून इतिहासामध्ये घडून आलेला बदल व स्थिती याचा आढावा घेणे.
५. समाजातील सर्व घटकावर कशा पद्धतीने इतिहास लिहिणे गरजेचे आहे ही भूमिका अभ्यासणे.
वरील उद्देशांना अनुसरूनच प्रस्तुत विषयाची मांडणी केलेली आहे.

**विषयविवेचन:**

'वंचितवादी इतिहास लेखन प्रवाह' म्हणजे समाजातील उपेक्षित, दलित, आदिवासी, महिला आणि तळागाळातील लोकांच्या इतिहासाला मुख्य प्रवाहात आणणे. इतिहास लेखनामध्ये साम्राज्यवादी, राष्ट्रवादी, मार्क्सवादी, वंचितवादी, स्त्रीवादी, संरचनावाद, उत्तर संरचनावाद, आधुनिकतावाद, उत्तर आधुनिकतावाद, नवमार्क्सवाद असे विविध प्रवाह नव्याने दिसून येतात. सामाजिक बदलामुळेच समाजातील विविध घटकांचा किंवा पैलूंचा स्वतंत्र स्वरूपात विचार होवू लागला. यातूनच 'वंचितवादी इतिहास लेखन प्रवाह' उदयास आला.

**१. इतिहास लेखन प्रवाह':** 'इतिहास लेखन प्रवाह' म्हणजे भूतकाळातील घटनांचा अभ्यास करण्यासाठी इतिहासकारांनी वापरलेली विविध वैचारिक दृष्टिकोन आणि पद्धती; यात वसाहतवादी, राष्ट्रवादी, मार्क्सवादी, सबऑल्टर्न (वंचितांचा), आणि स्त्रीवादी प्रवाह प्रमुख आहेत, जे इतिहासाकडे आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक दृष्टीने पाहतात. ज्यामुळे इतिहासाची अधिक व्यापक समज निर्माण होते. यातूनच १९ व्या शतकात साम्राज्यवादी इतिहास लेखनाच्या प्रवाहाने उपयुक्ततावादी व बुध्दीप्रमाण्यवादी विचारसरणीच्या आधारे ब्रिटिश साम्राज्यवादाची भूमिका मांडली. वंशश्रेष्ठत्व, उत्कांती, धर्मसांप्रदायवाद या सिध्दांतांनी साम्राज्यवादी नवविचारप्रवाहाचा पाया भक्कम केला. या सर्व सिध्दांताचे उद्दिष्ट भारतावरील ब्रिटिश शासन दृढ करणे, कायम टिकवणे हेच होते.[१] त्याची गरज भारतीयांच्या तत्कालीन अवनतीवर भर देवून काहींनी उपयुक्ततावादाच्या, मानवतावादाच्या निसर्ग नियमाच्या आधारे प्रतीपादीत केली.

**२.साम्राज्यवादी इतिहास**: लेखनाच्या या प्रवाहामध्ये केवळ साम्राज्यवादी दृष्टीकोनातून भारतीय संस्कृती व समाजजीवनाकडे पाहीले. साम्राज्यवादी इतिहास लेखनाच्या विचारप्रवाहाने इंग्लंड हे राष्ट्र प्रगत सुसंस्कृत राष्ट्र आहे. म्हणून मागासलेल्या समाजांना सुसंस्कृत करण्याचे व त्यांच्या क्रांतीचे कार्य ईश्वराने इंग्रजांवर सोपवले आहे अशी विचारसरणी साम्राज्यवादी इतिहास या प्रवाहाने वाढीस लावली. याला शास्त्रीय आधार देण्यासाठी वंशवादाचाही वापर केला जात होता. भारतीय समाजजीवनातर आरोप करण्याचा प्रयत्न या विचारप्रवाहामध्ये मोठ्या प्रमाणात झाला. जेम्स मील, हेन्नि इलियट, जेम्स स्टीफन, जी.वी. मॅलेसन, अल्फेड इ. साम्राज्यवादी इतिहासकारांनी या प्रवाहात भारतीयांना नैतिक, सांस्कृतीक, बौध्दिक, राजकीय, अशा सर्वच क्षेत्रात हीन दाखवण्याचा प्रयत्न केला.[२.] केवळ ब्रिटीश राजसत्तेच्या प्रगतीचे गुणगान करणे यावर त्यांच्या लिखानाचा भर होता. या लिखानातून

केवळ ब्रिटीश सत्ता राज्य करण्यासाठी कशा पध्दतीने पात्र आहे हे इंग्लंडमधील बुध्दीजीवी वर्गाला व सामान्य लोकांना दाखवून दयायचे होते.

साम्राज्यवादी नवविचार प्रवाहाने भारतीय संस्कृती हीन ठरविण्याचा प्रयत्न केला. पुढे भारतीय इतिहासाला न्याय देण्याचे कार्य राष्ट्रवादी इतिहास लेखन प्रवाहाने केले. सत्य अशा इतिहासाच्या साधनाचा आधार घेवून शास्त्रीय पध्दतीने व पुराव्यानिशी इतिहास लिहण्याचा, मांडण्याचा प्रयत्न राष्ट्रवादी इतिहास लेखनाच्या विचारधारेने धरला. राष्ट्रवादी इतिहास लेखन विचार धारेचे मुख्य उदीष्ट साम्राज्यवादी इतिहास लेखनाविरूध्द जनजागृती करणे, भारतीय संस्कृतीला न्याय देणे असे मानले जाते. ज्याचा उपयोग राष्ट्रीय एकात्मता वाढीसाठी प्रभावीपणे झाला. के. पी. जसवाल यांनी सभा व समित्यांचा अभ्यास करून भारतीय लोक पाश्चात्य लोकांपेक्षा हजारो वर्ष आघाडीवर होते असे मत व्यक्त केले.

**३. राष्ट्रवादी इतिहास लेखन** : राष्ट्रवादी इतिहास लेखन या प्रवाहान गणित, खगोलशास्त्र, बंदक, विज्ञान, व्यापार, संगित, नृत्य, शिल्प, कला सर्वच बाबतीत भारतीयांची श्रेष्ठता सांगण्याचा वस्तुनिष्ठ स्वरूपाने सांगण्याचा प्रयत्न केला. काशीप्रसाद जसवाल, बंकिमचंद्र चटर्जी, राधाकुमुद मुखर्जी, राजवाडे, न्या. रानडे, दादाभाई नौरोजी, रमेशचंद्र दत्त, बिपिनचंद्र यांच्या लिखानाने पुढे भारतीय स्वातंत्र्यचळवळ अधिकच गतिमान करण्याचा व वसाहतवादाविरूध्द लढण्याचा मार्ग मोकळा करून दिला. हा नवविचार प्रवाह, मुख्यतः भारतीय संस्कृतीचा महानता सांगणारा, वस्तुनिष्ठपणे मांडणी करणारा, वसाहतवादाचे वास्तव स्वरूप मांडणारा प्रवाह ठरला. राष्ट्रवादी इतिहास लेखन त्यातूनच पुढे प्रादेशिक इतिहास लेखनास चालना मिळत गेली. राष्ट्रवादी इतिहास लेखन या प्रवाहाने भारतीय राष्ट्रीय जनजागृती व वैचारिक भावना वाढीस लावली. ज्याचा परिणाम स्वातंत्र्य चळवळीमध्ये दिसून आला.[३]

**४. मार्क्सवाद नवविचार प्रवाह विचार** : मार्क्सवाद नवविचार विचार प्रवाहाने भौतिकवादी दृष्टीकोन व वर्गसंघर्ष या सिध्दांतातून समाजाकडे बघण्याचा नवा दृष्टीकोन जगासमोर नवविचार प्रवाहाच्या रूपाने पुढे आला. समाजामध्ये उत्पादन पध्दत, उत्पादन शक्ती यामुळे संघर्ष होतो आणि या संघर्षातूनच विकास असे सुत्र या विचारधारेने मांडले. मार्क्सवाद नवविचार प् प्रवाहाने आर्थिक घटक हाच समाजाचा पाया आहे असा विचार इतिहस लेखनाच्या प्रवाहात आणला. समाजाचा वैचारिक वर्गकलह, संघर्ष यातून मार्क्सवाद नवविचार प्रवाह उदयास आला. परंतू या विचार धारेच्या विरूध्द नवमार्क्सवादी तत्वज्ञान निर्माण झाले. आधुनिक समाजातील कठिण समस्या व संघर्ष सांगण्याचा प्रयत्न या विचारधारेने केला.

**५. वंचितांचा इतिहास :** वंचितांचा इतिहास म्हणजे समाजातील असे गट जे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक किंवा राजकीय कारणांमुळे मागे पडले आहेत (उदा. दलित, आदिवासी, महिला, गरीब), त्यांच्या संघर्षाचा, जीवनशैलीचा आणि हक्कांसाठीच्या लढ्याचा अभ्यास होय; जो मुख्य प्रवाहातील इतिहासाने दुर्लक्षित केलेल्या समाजाच्या तळागाळातील लोकांच्या कथांना महत्त्व देतो. इतिहास लेखनातील नवविचार प्रवाह अथवा दृष्टीकोन यामुळे वस्तुनिष्ठता, वास्तववाद, जसे घडले तसे लिहणे, भूतकाळाची नव्याने मांडणी करण्याचा प्रयत्न झलेला दिसून येतो. प्राचीन भारतीय संस्कृतीच्या अभिमानाने पुनरूज्जीवनवादी विचारप्रवाहाला गती देण्याचे स्वातंत्र्यचळवळीच्या प्रारंभीच्या पर्वात कार्य केले. याच प्रवाहामुळे भारतीय अभ्यासकांना आपला इतिहास साहित्य संस्कृती यांचा अभ्यास करण्याची प्रेरणा मिळाली. इतिहास लेखनातील नवविचार प्रवाह अथवा दृष्टीकोन यामुळे वस्तुनिष्ठता, वास्तववाद, जसे घडले तसे लिहणे, भूतकाळाची नव्याने मांडणी करण्याचा नवविचार प्रवाहास सुरूवात पौर्त्यवादी इतिहास लेखनामुळे झाली.

**६. वंचितवादी इतिहास लेखन प्रवाह** : प्रवाहाचा मुख्य उद्देश इतिहास लेखनातून समाजातील 'वंचित' घटकांना स्थान देणे आहे, ज्यांना मुख्य प्रवाहाच्या इतिहासात दुर्लक्षित केले गेले. हा प्रवाह समाजातील सामान्य लोक, शेतकरी, कामगार, स्त्रिया यांच्या जीवनातील घटना, त्यांचे संघर्ष आणि योगदानावर लक्ष केंद्रित करतो.इटालियन विचारवंत अँटोनियो ग्रामशी यांच्या 'सबॉल्टर्न' (तळागाळातील) संकल्पनेतून प्रेरणा घेऊन हा प्रवाह विकसित झाला. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखनातून भारतात या विचारांची मुळे दिसतात, ज्यात सामाजिक विषमतेवर आधारित इतिहासाची मांडणी आहे. लोककथा, गाणी, म्हणी आणि मौखिक परंपरा हे वंचितांच्या इतिहासाचे महत्त्वाचे स्रोत मानले जातात. इतिहास लेखनातील 'ओरिएंटलिस्ट' या संज्ञेनेच प्रथमतः भारतीय संस्कृतीची व इतिहासाची व्यापक ओळख करून येण्याचा प्रयत्न झाला. यूरोपीय जगाला प्राचीन भारतीय संस्कृतीचा व समृध्द वाङ्मयाचा परिचय झाल्याने प्राचीन भारतीय संस्कृती प्रगत होती, विकसीत होती, भारतीय लोक मागासलेले

नव्हते तर विद्वान होते याचे आकलन आले. याचे सर्वच श्रेय पौर्वात्यवादी इतिहास लेखन या प्रवाहास जाते.

इतिहास लेखन प्रवाहामध्ये सर्वसामान्य लोकांच्या इतिहासावर भर देणारा नवा दृष्टीकोन सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाह म्हणून जगासमोर नव्यानेच उदयास आला. तळागाळातील लोकांच्या पराक्रमाची नोंद या प्रवाहाने जगासमोर मांडली. वर्चस्ववादी गट वंचित वांचे राजकिय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतीक शोषण कशा पध्दतीनं करतो याचे विवेचन लिहणारा हा इतिहासातील नवविचार प्रवाह होता. दुय्यम समूहांचा इतिहास या अर्थाने सबाल्टर्न अथवा वंचितवादी इतिहास लेखन या प्रवाहास ओळखले जाते. वंचितांच्या भूमिदृष्टीतून हा इतिहास लेखनाचा प्रवाह उदयास आला. वंचितवादी इतिहास लेखनामध्ये मुख्यतः इतिहास विषयक दृष्टिकोनाची मांडणी करताना वैचारिक धोरणाची व धारणांची चर्चा ही अपरिहार्य स्वरूपाची ठरते.[४] भारतीय इतिहासाच्या संदर्भात भांडवलशाहीचे स्वरूप व वर्ग संघर्षांच्या दृष्टिकोनाच्या मूल्यांकनातून साम्यवादी विचारधारणांची वैचारिक भूमिका वंचितवादी इतिहास लेखनाचा पाया ठरला.

या इतिहास लेखन प्रवाहामुळे भारताच्या वसाहतीक इतिहास लेखनातील त्रुटी दूर करण्यासाठी व भारतीय राष्ट्रवादाच्या सम्यक आकलनासाठी हा प्रवाह किती उपयुक्त आहे याची मांडणी या इतिहासकारांनी पुढे घेतलेली दिसून येते. त्यातूनच वंचितवादी समूहांच्या स्वतंत्र अस्तित्वाचा सिद्धांत समाजासमोर मांडण्यात आला.[५] एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये व विसाव्या शतकाच्या सुरुवातीला शेतकरी वर्गाची स्थिती, कामगारांचे संघटन, आदिवासींचे उठाव, स्त्रीवादी चळवळी विषयी मांडणी असे विषय या इतिहास लेखनाने पुढे आणले त्यामुळेच खऱ्या अर्थाने समाजामध्ये जनजागृती निर्माण होत गेली असे म्हटले तरीही काही वावगे ठरणार नाही.

सबाल्टर्न इतिहास लेखन या प्रवाहाने सर्व सामान्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. वंचितांचा इतिहास लिहिणारे अनेक लेखक आहेत ज्यात महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर (भारतात), तसेच मार्क्सवादी विचारधारेतून अँटोनिओ ग्रामची (इटली) यांसारख्या विचारवंतांचा समावेश होतो, जे समाजातील तळागाळातील लोकांचा आणि वंचित घटकांचा इतिहास लिहिण्यावर भर देतात. भारतात, वंचित चळवळींच्या उदयानंतर, त्यांनी स्वतःचा इतिहास लिहिण्यास सुरुवात केली आणि इतिहासलेखनाला नवी दिशा दिली. सबाल्टर्न इतिहास लेखन या प्रवाहातून आदिवासी वर्गाचा इतिहास, शेतकरी वर्गाचा इतिहास, स्त्रीवादी इतिहास लेखन प्रवाह, कामगार वर्ग जे न्यायापासून वंचित आहेत त्याची दखल घेण्याच्या उद्देशानेच या प्रवाहाचा उदय झाला.[६] सबाल्टर्न इतिहास लेखन या प्रवाहाने भारतीय संस्कृतीचे आधुनिकतेपासून जतन केले. भारतीय संस्कृतीचे सार समूहामध्ये दाखविण्याचा प्रयत्न केला. केवळ वर्ग या कल्पनेस स्थान न देता इतिहासलेखन करणे, वर्ग, जात, लिंगभाव यांचा परस्परसंबंधाचा विचार करणे, जाती चळवळीकडे लक्ष देणे अशा विविध संकल्पना रुजवल्या.[७]

या विचारधारेचे सकारात्मक घटक म्हणजेच अभिजन ही संज्ञा प्रभुत्व गाजवणाऱ्या गटाची निदर्शक आहे असे चित्र असताना वंचितवादी इतिहास लेखनाने तळागाळातील घटक केंद्रस्थानी ठेवून इतिहास लेखनास वैचारिक बैठक प्राप्त करून दिली. तळागाळातील वर्गाची स्थिती सुधारणे यासाठी खऱ्या अर्थाने दखल घेतली जावी हे सूत्र या वर्गानेच पुढे आणले. आपल्या नैसर्गिक अधिकारापासून वंचित ठेवलेल्या समाज गटांच्या कृतींचा व त्या गटांमधील परस्पर संबंध सत्ता केंद्रित असणाऱ्या समाज व्यवस्थेतील घटकांचा अंतर्भाव यांचा अभ्यास या इतिहास लेखनाने केल्यामुळेच खऱ्या अर्थाने तळागाळातील लोकांच्या स्थिती व वास्तवदर्शी चित्रणाचा परिचय समाज व्यवस्थेमध्ये झालेला दिसून आला.[८]

थोडक्यात, हा इतिहास समाजातील 'अदृश्य' राहिलेल्या लोकांच्या कथांना आवाज देतो आणि समता व न्यायाच्या निर्मितीसाठी महत्त्वाचा ठरतो. वंचित गटांच्या जाणिवेचे वास्तव स्वरूप त्यांची मानसिकता त्यांच्या जाणिवा व त्यांचे प्रत्यक्षदर्शी चित्र स्थळ, काळ, वेळ यानुसार समाजासमोर मांडले तर नक्कीच या वर्गास न्याय मिळवून देऊ शकतो हि भूमिका याच इतिहास लेखनाने पुढे आणली. आजवर दुर्लक्षित राहिलेल्या विविध विषयांचा परामर्श याच इतिहास लेखनातून झाल्याने खऱ्या अर्थाने वास्तव चित्र पुढे आले असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. थोडक्यात पौरात्यवाद, साम्राज्यवाद, राष्ट्रवाद, वचितवादी इतिहास लेखन, मार्क्सवाद या नवविचार प्रवाहामुळे इतिहास लेखनात सर्वच घटकांची यथार्थपणे नोंद घेण्याचा प्रयत्न वस्तुनिष्ठ पध्दतीने झाला. त्याचाच परिणाम म्हणून इतिहासामध्ये सर्वच घटकांची दखल घेतली गेली त्यामुळे वैचारिक जनजागृती घडून आली.

**निष्कर्ष:**

१. ‘इतिहास लेखन प्रवाह’ म्हणजे भूतकाळातील घटनांचा अभ्यास करण्यासाठी इतिहासकारांनी वापरलेली विविध वैचारिक दृष्टिकोन आणि पद्धती; यात वसाहतवादी, राष्ट्रवादी, मार्क्सवादी, सबऑल्टर्न (वंचितांचा), आणि स्त्रीवादी प्रवाह प्रमुख आहेत.

२. साम्राज्यवादी इतिहास लेखनाविरूध्द जनजागृती करणे, भारतीय संस्कृतीला न्याय देणे हे राष्ट्रवादी इतिहास लेखन धारेचे सूत्र मानले जाते.

३. आर्थिक घटक हाच समाजाचा पाया आहे असा विचार मार्क्सवाद नवविचार प्रवाह विचार प्रवाहाने इतिहस लेखनाच्या प्रवाहात आणला.

४. वर्ग संघर्षांच्या दृष्टिकोनाच्या मूल्यांकनातून साम्यवादी विचारधारणांची वैचारिक भूमिका वंचितवादी इतिहास लेखनाचा पाया ठरला.

५. सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाह सर्वसामान्य लोकांच्या इतिहासावर भर देणारा नवा दृष्टीकोन म्हणून जगासमोर नव्यानेच उदयास आला.

६. तळागाळातील लोकांच्या पराक्रमाची नोंद सबाल्टर्न इतिहास लेखन या प्रवाहाने जगासमोर मांडली.

७. हा इतिहास समाजातील 'अदृश्य' राहिलेल्या लोकांच्या कथांना आवाज देतो आणि समता व न्यायाच्या निर्मितीसाठी महत्त्वाचा ठरतो.

८. सबाल्टर्न इतिहास लेखन या प्रवाहाने आजवर दुर्लक्षित राहिलेल्या विविध विषयांचा परामर्श याच इतिहास लेखनातून झाल्याने खऱ्या अर्थाने वास्तव चित्र पुढे आले असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

९. वचितवादी इतिहास लेखन, मार्क्सवाद या नवविचार प्रवाहामुळे इतिहास लेखनात सर्वच घटकांची यथार्थपणे नोंद घेण्याचा प्रयत्न वस्तुनिष्ठ पध्दतीने झाला.

१०. इतिहासामध्ये सर्वच घटकांची दखल घेतली गेली त्यामुळे वैचारिक जनजागृती घडून आली.

**तळटीपा:**

१. डॉ. कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर प्रथमावृत्ती २००५, पृ.क्र.१६१-१६२.

२. कित्ता. पृ.क्र.२१०-२१२.

३. कित्ता. पृ.क्र.२२१..

४. वांबूरकर जास्वंदी (संपा.), इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१४, पृ.क्र.१२९.

५. कित्ता. पृ.क्र.१३१-१३३..

६. सरदेसाई बी.एन. इतिहासलेखन शास्त्र फडके प्रकाशन कोल्हापूर प्रथमावृत्ती २००५, पृ.क्र.१४५.

७. पुर्वाक्त, इतिहासातील नवे प्रवाह, पृ.क्र.१३३..

८. पुर्वाक्त, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, पृ.क्र.१३५.